# महाराष्ट्रातील पर्यटन क्षेत्रातील कंत्राटी कामगार : समस्या आणि उपाय

**वेदिका अशोक मोटे**, संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**ई मेल** : **मो.** ७७०९७२६९८१

---

**प्रस्तावना**

जगामध्ये दरवर्षी २७ सप्टेंबर हा दिवस जागतिक पर्यटन म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचा उद्देश आंतरराष्ट्रीय समुदायात पर्यटनाविषयी जागरूकता निर्माण करणे. पर्यटन हा सर्वांच्या आवडीचा विषय आहे. पर्यटनाने मानवाचे थकलेले मन, शरीर ताजेतवाने, प्रसन्न होते. पर्यटन म्हणजे नवीन ठिकाणी प्रवास करणे, तेथील संस्कृती, इतिहास, प्रकृती आणि जीवनशैली जाणून घेवून त्याचा आनंद, अनुभव घेणे होय. थोडक्यात मनोरंजन भाणि विश्रांतीचा मार्ग म्हणजे पर्यटन होय. आजच्या काळात पर्यटन हा जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या उद्योगापैकी एक आहे. अनेक देशासाठी परकीय चलन आणि रोजगार निर्मितीचे एक साधन आहे. पर्यटन क्षेत्र म्हटले की तिथे वेगवेगळ्या सोई-सुविधा उपलब्ध कराव्या लागतात. या सुविधा सरकारी किंवा खासगी स्वरुपात असतात. हॉटेल्स, वाहतूक, स्वच्छता, सुरक्षा, गाईड्स, आरोग्य इ. सुविधा असतात. या सुविधा पर्यटकांना देण्यासाठी कंत्राटी कर्मचारी वर्ग कार्यरत आहे. जो हंगामी स्वरूपाचे काम करतो. सध्या पर्यटन क्षेत्रात कंत्राटी कर्मचारी वर्गाचे प्रमाण वाढले आहे. पण या कंत्राटी कर्मचाऱ्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. महाराष्ट्रातील पर्यटन क्षेत्रात देखील मोठ्या प्रमाणावर कंत्राटी कामगार आहेत. जे हॉटेल, गाईड्स, वाहतूक, सुरक्षा, स्वच्छता इ. काम करत असतो. या संशोधन पेपरमध्ये महाराष्ट्रातील पर्यटन क्षेत्रातील कंत्राटी कामगारांच्या समस्या जाणून घेवून त्यावरील उपाययोजनांचा अभ्यास करणार आहे.

**उद्देश**

१) कंत्राटी कामगारांच्या समस्यांचा अभ्यास करणे.

२) कंत्राटी कामगारांच्या हक्कांचे उल्लंघन होते का याचा अभ्यास करणे.

३) कंत्राटी कामगार (नियमन आणि उच्चाटन) अधिनियम, १९७० या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होते का याचा अभ्यास करणे.

महाराष्ट्र हे भारताच्या पश्चिम किनारपट्टीवरील एक प्रमुख पर्यटन राज्य असून, समृद्ध इतिहास, सह्याद्रीच्या पर्वतरांगा, युनेस्को जागतिक वारसा स्थळे आणि सुंदर कोकण किनारपट्टीसाठी प्रसिद्ध आहे. अजिंठा-वेरूळ लेणी, मुंबईतील गेट वे ऑफ इंडिया, महाबळेश्वर, लोणावळा आणि धार्मिक स्थळे जसे की शिर्डी, पंढरपूर, सिद्धीविनायक (मुंबई), त्र्यंबकेश्वर (नाशिक) आणि कोल्हापूरचे महालक्ष्मी मंदिर इत्यादी पर्यटकांचे प्रमुख आकर्षण आहेत. महाराष्ट्रातील तसेच भारतातील पहिला पर्यटन जिल्हा म्हणून सिंधुदुर्ग जिल्हा ओळखला जातो. अशा अनेक सौंदर्याने महाराष्ट्र राज्य नटलेला दिसून येतो.

महाराष्ट्रातील पर्यटन क्षेत्र हा राज्याचा आर्थिक विकासाचा एक महत्त्वाचा भाग आहे. जे रोजगाराच्या मोठ्या संधी निर्माण करत असते. विशेषतः हॉटेल, रिसॉर्टस आणि वाहतूक यांचा वाटा खूप महत्त्वाचा आहे. २०२५ च्या आकडेवारीनुसार महाराष्ट्राची अर्थव्यवस्था ४९.३९ ट्रिलियन रूपये (सुमारे ५८० अब्ज डॉलर) असून त्यात पर्यटन क्षेत्राचा वाटा साधारण ६.५ टक्के ते ६.८८ टक्के इतका आहे. पर्यटन क्षेत्रातील हॉटेल आणि संसाधनाच्या वाट्याबद्दलची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे -

**१) आर्थिक वाटा**

- पर्यटन क्षेत्राकडून महाराष्ट्राच्या Gross state Value added (GSVA) मध्ये सुमारे २६ अब्ज डॉलर इतके एकूण योगदान आहे.
- हॉटेल, रेस्टॉरंट्स आणि वाहतूक यासारख्या सेवांमधून सुमारे ३ टक्के प्रत्यक्ष वाटा.

- रोजगार - राज्यात सुमारे ५९ लाखाहून अधिक लोकांना रोजगार मिळाला.

२) महाराष्ट्र हे होटल क्षेत्राला 'उद्योगाचा दर्जा' देणारे देशातील पहिले राज्य आहे. यामुळे हॉटेल्सना वीज पाणी आणि मालमत्ता कराचे दर निवासी दराऐवजी औद्योगिक दराने आकारले जातात. ज्यामुळे या क्षेत्राची नफा क्षमता वाढण्यास मदत होते. पर्यटन क्षेत्रात दर १०० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीतून किमान १०,००० नवीन नोकऱ्या निर्माण करण्याचे राज्याचे उद्दिष्ट आहे. महाराष्ट्रात २०२४ च्या आकडेवारीनुसार सुमारे १८.९३ कोटी देशांतर्गत पर्यटक आणि ३७.०५ लाख परदेशी पर्यटकांनी भेट दिली. विदेशी पर्यटकांच्या पसंतीस उतरलेले महाराष्ट्र हे भारतातील पहिल्या क्रमांकाचे राज्य आहे.

पर्यटन हे महाराष्ट्रातील रोजगाराची संधी निर्माण करणारे महत्त्वाचे क्षेत्र असल्यामुळे हॉटेल, वाहतूक, सुरक्षा, गाईड्स, स्वच्छता आणि आरोग्य या सेवा पर्यटकांना देण्यासाठी पर्यटन क्षेत्रात कर्मचारी वर्गाचे प्रमाण जास्त असलेले दिसून येते. हा कर्मचारी वर्ग कायमस्वरूपी नसून कंत्राटी पद्धतीने नियुक्त केलेला आहे. सध्या प्रत्येक शासकीय कार्यालयामध्ये कायमस्वरूपी कर्मचारी नियुक्त न करता कंत्राटी पद्धतीने कर्मचारी नियुक्त केला जातो. कारण सरकारला कायमस्वरूपी कर्मचारी वर्गाप्रमाणे कंत्राटी कर्मचाऱ्यांना पगाराशिवाय कोणतेही शासकीय लाभ द्यावे लागत नाहीत. याबाबतीत पर्यटन क्षेत्रही मागे नाही. या क्षेत्रात तर कंत्राटी कामगारांचे प्रमाण वाढत चालले दिसून येते.

पर्यटन क्षेत्रातील कंत्राटी कामगारांची नेमणूक प्रामुख्याने कंत्राटदार किंवा सरकारी किंवा बाह्य संस्था ज्या शासनाला कामगार पुरवठा करण्याचे कार्य करतात. हे कर्मचारी संबंधित संस्थेकडून थेट भरती केले जातात. अर्थात कामाच्या स्वरुपानुसार मुलाखतीचा, कामाच्या अनुभवाचा विचार केला जातो. हे कंत्राटी कर्मचारी तात्पुरत्या किंवा हंगामी कालावधीसाठी ६ ते १२ महिन्यांच्या करारांवर नियुक्त केला जातो. ज्यामध्ये त्यांना ठराविक मानधन मिळते. यात भरतीची आणि नियमांची जबाबदारी संबंधित संस्थेची असते. काही वेळा ऑनलाइन पद्धतीने थेट भरती केली जाते. कंत्राटी भरती पद्धतीमुळे सरकारला आर्थिक बचत झाली, काम वेळेवर पूर्ण होऊ लागली, वेळेचे बंधन पाळले जावू लागले, जबाबदारीने व प्रामाणिकपणे कर्मचारी काम करू लागला इत्यादी फायदे झाले आहेत. पण पर्यटन क्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या कंत्राटी कामगारांसमोर अनेक अडचणी, समस्या उभ्या आहेत जसे की कमी वेतनामुळे आर्थिक टंचाई, शारीरिक, मानसिक संतुलन बिघडते, कर्जबाजारीपणा, बेरोजगारी, कौटुंबिक समस्या निर्माण झाल्या आहेत. या वाढत्या समस्यामुळे कंत्राटी कर्मचारी जीवाचे बरे-वाईट करण्याचे टोकाचे पाऊल उचलताना दिसतात.

**कंत्राटी कर्मचारी वर्गाच्या समस्या**

**१) नोकरीची अनिश्चितता**

हंगामी नोकरी असल्यामुळे बाकीचे काही महिने रोजगार मिळण्यात अडचण येते त्यामुळे आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो.

**२) कमी वेतन जास्त काम**

कंत्राटी कामगारांना नियमित कामगारांपेक्षा कमी वेतन मिळते आणि जास्त काम असते. जास्त कामांच्या मानाने वेतन दिले जात नाही.

**३) कंत्राटी कामगारांची संख्या**

महाराष्ट्रातील पर्यटन क्षेत्रात कंत्राटी कामगारांची संख्या मोठी आहे. परंतु त्यांना नियमित कामगाराप्रमाणे वेतन आणि शासकीय सुविधा मिळत नाही.

**४) असंघटित कर्मचारी**

कंत्राटी कामगारांना श्रम अधिकार मिळत नाही म्हणजे संघटना स्थापन करण्याचा अधिकार नाही. हे कर्मचारी संघटित नसल्यामुळे यांच्या समस्या, प्रश्न सरकारपर्यंत पोहचू शकत नाही.

**५) सामाजिक सुरक्षा लाभांचा अभाव**

काही कर्मचाऱ्यांचे काम अतिजोखमीची असतात. जीव धोक्यात घालून काम करावे लागते तरीसुद्धा PF आणि ESIC (पीएफ आणि ईएसआयसी) सारख्या सामाजिक सुरक्षांचा लाभ मिळत नाही.

**६) कंत्राटदाराकडून शोषण**

या कर्मचारी वर्गाचे कंत्राटदाराकडून शोषण केले जाते. वेळेवर वेतन दिले जात नाही, जास्त कामाचे तास लावले जातात, अपमान केला जातो, विश्रांती घेता येत नाही.

**७) कामाच्या अयोग्य अटी**

कामांच्या तासांची मर्यादा नसते, करारावर आधारित काम असल्यामुळे, वेळेवर काम पूर्ण करणे, करार संपला नोकरी गेली.

**८) कायद्याची अयोग्य अंमलबजावणी**

शासनाने कंत्राटी कामगार (नियमन आणि निर्मुलन) अधिनियम, १९७० हा कायदा केला. या कायद्याअंतर्गत कंत्राटी कामगारांच्या रोजगार आणि सेवाशर्तींचे नियमन केले जाते. पण या कायद्याची कडक अंमलबजावणी होत नाही.

**९) मानसिक, शारीरिक स्वास्थ्य बिघडते**

करारावर आधारित काम असल्यामुळे करार पूर्ण झाल्यावर पुढे काय करायचे, वेळेवर काम करण्याची जबाबदारी यासारख्या अनेक प्रश्न मनात असतात तसेच जास्त कामाचे तास असल्यामुळे, वेळेवर काम पूर्ण करावे लागत असल्यामुळे विश्रांती घेता येत नाही, सुट्टी मिळत नाही त्यामुळे शारीरिक स्वास्थ्य बिघडते.

**कंत्राटी कामगारांच्या समस्यावरील उपाय**

**१) कंत्राटी कामगार कायद्याची कठोर अंमलबजावणी**

कंत्राटी कामगार कायद्याची कठोर अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. तरच कामगारांचे शोषण होणार नाही. त्यांच्या हक्कांचे संरक्षण होवू शकते.

**२) सामाजिक सुरक्षांचा लाभ देणे**

पर्यटन क्षेत्रामध्ये कंत्राटी कामगारांना जोखमीची कामे करावी लागतात जसे की वाहतूक, सुरक्षा या विभागात कामगारांच्या जीवाला धोका असतो तरीसुद्धा जीव धोक्यात घालून कामगार काम करतात म्हणून त्यांना पीएफ, ईएसआयसी, पेन्शन, रजा आणि वैद्यकीय सेवा इ. लाभ देण्यात यावा.

**३) संघटना बनविणे**

कंत्राटी कर्मचाऱ्यांची संघटना बनविणे. जेणेकरून या कामगारांच्या समस्या, प्रश्न सरकार पुढे मांडता येतील.

**४) थेट वेतन**

कंत्राटी कर्मचाऱ्यांना कंत्राटदाराकडून वेतन न देता थेट कामगारांच्या बँक खात्यात वेतन जमा करावे जेणेकरून कंत्राटदाराकडून वेतन विलंब होणार नाही.

**६) प्रशिक्षण आणि कौशल्य विकास**

पर्यटन विभागामार्फत कर्मचाऱ्यांना उच्च दर्जाचे प्रशिक्षण देऊन त्यांची कार्यक्षमता वाढविणे.

**७) कामामध्ये नियमितता**

पर्यटन हा हंगामी उद्योग असल्यामुळे वर्षातील काही महिने कामगार बेरोजगार राहतात त्यामुळे कामगारांना कायमस्वरूपी काम देण्यात यावे.

**८) कंत्राटी कामगार मंडळ**

कामगारांच्या हक्कासाठी विशेष मंडळ स्थापन करून शोषणापासून संरक्षण करणे.

**९) कंत्राटदारांवर नियंत्रण**

कामगारांचे शोषण करणाऱ्या कंत्राटदारांवर कठोर कारवाई करणे.

**१०) ई - श्रम नोंदणी**

सर्व कामगारांची ई-श्रम पोर्टलवर नोंदणी करून त्यांना सरकारी योजनांशी जोडणे.

**११) कायदेशीर पळवाटा रोखणे**

कंत्राटी कामगार कायदा (१९७०) अंतर्गत कामगारांना योग्य सुविधा मिळतील यासाठी तपासणी पथक तयार करणे.

**समारोप**

महाराष्ट्रातील पर्यटन क्षेत्र हे राज्याच्या अर्थव्यवस्थेचा एक भक्कम आधारस्तंभ आहे आणि पर्यटन क्षेत्राचा कंत्राटी कामगार हा कणा आहे. हाच कणा जर उपेक्षित आणि असुरक्षित असेल तर मुख्य अर्थव्यवस्थेला धक्का लागू शकतो. कामाची अनिश्चितता, अल्प वेतन, सामाजिक सुरक्षेचा अभाव यामुळे कंत्राटी कामगारांमध्ये असंतोष आणि आर्थिक अस्थिरता दिसून येते. केवळ कायदे बनवून या समस्या सुटणार नाहीत तर त्यांची तळगाळापर्यंत अंमलबजावणी होणे काळाची गरज आहे. जर महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ आणि खासगी कंत्राटदारांनी मिळून कामगारांच्या प्रशिक्षणावर आरोग्यावर आणि हक्कांवर लक्ष दिले, तर हेच कामगार राज्याच्या पर्यटनाला जागतिक स्तरावर नेण्यास अधिक सक्षम होतील.

**संदर्भ**

१) कंत्राटी कामगार (नियमन आणि निर्मुलन) कायदा, १९७०.

२) https://mr.wikipedia.org

३) https://tourismnotes.org

४) https://vishwakosh.marathi.gov.in

५) https://www.ibet.org

६) https://maharashtratourism.gov.in

७) चव्हाण, वाय., (२०२०), महाराष्ट्रातील कंत्राटी कामगार : कायदे व समस्या (IJCRT, Volume 8)

८) बोकडे हर्षाली (August, 2025), कंत्राटी कामगारांच्या समस्यांचा अभ्यास (Volume-6) Skylark International Publication.